# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**मराठा क्रांती मोर्चा, पुणे जिल्हा व इतर संघटना यांचे दि. ०९/०८/२०१८ चे आंदोलनाबाबत, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था एक दिवस बंद ठेवणेबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, दि. ०९/०८/२०१८ रोजी मराठा समाजाच्या वतीने त्यांच्या विविध मागण्यांकरीता ठिकठिकाणी रास्तारोको, रेलरोको, मोर्चे अशी आंदोलने करणार असून सकल मराठा समाजाच्या वतीने संपुर्ण महाराष्ट्र बंदचे आवाहन केलेले आहे. महाराष्ट्र बंदच्या अनुषंगाने मा. जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

मा. जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, विद्यापीठ प्रशासकीय विभाग गुरूवार, दि. ०९/०८/२०१८ रोजी बंद ठेवण्यात येत आहे. तसेच विद्यापीठातील पुर्वनियोजित सभा पुढे ढकलण्यात येत आहेत. सदर दिवशी अपूर्ण राहणारा अभ्यासक्रम/कामकाज अन्य सुटीच्या दिवशी पुर्ण करण्यात यावा, याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

AS
8/8/18
(डॉ. अरविंद शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/२९६७ )
दिनांक : ०८/०८/२०१८ )

प्रत:

मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. विद्यापरिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
सहा. कुलसचिव, मा. कुलगुरू यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
सहा. कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Desktop/vidita/circulars